**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठाच्या हिवाळी २०२१ च्या स्थगित परीक्षा १३ जानेवारी पासून**

**विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परीक्षा विभागाच्यावतीने सर्व संबंधित विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, हिवाळी २०२१ च्या परीक्षा (अभियांत्रिकी व तांत्रिकी, भेषजी) दिनांक ३ जानेवारी, २०२२ पासून सुरु होणार होत्या, परंतू त्या विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघाच्या बेमुदत बंद आंदोलनामुळे स्थगित करण्यात आल्यात. सदर स्थगित करण्यात आलेल्या परीक्षा आता दि. १३ जानेवारी, २०२२ पासून सुरु करण्यात येत आहे. सदर परीक्षांचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून वेळापत्रकाची प्रत्र सर्व संबंधित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक विभागप्रमुखांना पाठविण्यात आली आहे. याशिवाय सुधारित वेळापत्रक विद्यापीठाचे संकेस्थळावर सुद्धा प्रकाशित करण्यात आली आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. ०१/०१/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी